पुढारी पा. नं ३.

# मिरा-भाईंदर, वसई-विरारमधील पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या

**मिरारोड : पुढारी वृत्तसेवा**

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील अनेक वरिष्ठ पोलीस अधिकारी यांच्या बदल्या पोलीस आयुक्तालयाअंतर्गत करण्यात आल्या आहेत.

महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ मधील कलम २२ (न) (२) मधील सुधारीत स्पष्टीकरणानुसार प्रदान केलेल्या अधिकारान्वये मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय स्तरावरील पोलीस आस्थापना मंडळाने पोलीस अधिकारी यांची मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाअंतर्गत बदल्या केल्या आहेत. यामध्ये पोलीस निरीक्षक देविदास किसन हंडोरे हे पूर्वी अमली पदार्थविरोधी पथक, गुन्हे शाखा येथे कार्यरत होते त्यांची आता प्रभारी वाहतुक शाखा, काशिमिरा युनिट, पोनि संदीप सिताराम कदम, पूर्वी नियंत्रण कक्ष, नव्याने नियुक्ती प्रभारी, काशिमिरा पो.स्टे, पोनि दादाराम सुभाष कारंडे पूर्वी प्रभारी वाहतुक शाखा विरार, नव्याने प्रभारी, उत्तन पो.स्टे, पोनि प्रशांत केशव लांगी, पूर्वी उत्तन पोस्टे नव्याने प्रभारी वाहतुक शाखा, विरार पोनि संजय दत्तु हजारे पूर्वी प्रभारी काशिमिरा पो.स्टे नव्याने, परवाना शाखा, पोनि रणजित सूर्यकांत आंधळे प्रभारी, परवाना शाखा, नव्याने वसई पो.स्टे, पोनि राजेंद्र गणपत कांबळे प्रभारी, तुळींज पो.स्टे, नव्याने विरार पो.स्टे प्रभारी पोनि शैलेंद्र रघुनाथ नगरकर नियंत्रण कक्ष नव्याने तुळींज पो.स्टे, पोनि कल्याणराव एकनाथ कर्पे प्रभारी, वसई पो.स्टेंनव्याने अर्नाळा पो.स्टे प्रभारी, पोनि सुरेश हरिभाऊ वराडे प्रभारी, विरार पो.स्टे, नव्याने प्रभारी विशेष शाखा, पोनि अमर अनिल मराठे, पेल्हार पो.स्टे प्रभारी, नव्याने अमली पदार्थ विरोधी पथक गुन्हे शाखा, पोनि वसंत चंद्रकांत लब्दे, आर्थिक गुन्हे शाखा प्रभारी, पेल्हार पो.स्टे., पोनि राजु किसनराव माने प्रभारी, अर्नाळा पो.स्टे नव्याने नियंत्रण कक्ष या पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या असल्याचे प्रकाश गायकवाड, पोलीस उप आयुक्त मुख्यालय मिरा-भाईंदर, वसई विरार यांनी सांगितले.

# हॉटेल व्यावसायिकावर लाचेचा गुन्हा

## इस्टेट एजंटकडे मागितली चक्क २ लाखांची रक्कम

**भाईंदर : पुढारी वृत्तसेवा**

मीरारोड पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्ह्यातील अटक टाळण्यासाठी याच पोलीस ठाण्यातील सहाय्यक पोलीस निरीक्षक व त्याचा रायटर यांनी दाखल गुन्ह्यातील दुसरा आरोपी चायनिज हॉटेल व्यावसायिकामार्फत एका इस्टेट एजंटकडे २ लाखांची लाच मागितल्याचे उघड झाले आहे. याप्रकरणी गुन्हा दाखल झाला आहे.

काशिमीरा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील काशिगाव येथील लव्हली चायनीज हॉटेलचा चालक हबीब इब्राहिम रहमान (३९) याच्या मार्फत खान नामक तक्रारदार यांच्याकडे २ लाखांची मागणी केली. याप्रकरणी ठाणे लाचलुचपत प्रतिबंध विभागाने (एसीबी) १० जानेवारी रोजी काशिमीरा पोलीस ठाण्यात तूर्तास हबीब विरोधात भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ मधील कलम ७ (अ) नुसार गुन्हा दाखल करून त्याला अटक केली.

यात सहाय्यक पोलीस निरीक्षक व त्यांचे रायटर यांचा थेट संबंध आला नसल्याने एसीबीने अद्याप त्यांची नावे गुन्ह्यात नमूद केलेली नाहीत. मिरा-भाईंदरमध्ये प्रॉपर्टी डिलरचे काम करणाऱ्या खान नामक व्यावसायिकाने मीरारोड येथील हटकेश परिसरात आसिफ खान यांचा एस. ए. स्टूडीओ, के. सरा सरा प्रा. लि. यांना ऑगस्ट २०२२ मध्ये भाडेतत्वावर दिला होता. यात खान यांच्यासह आरोपी हबीब व परवीन कुमार सिंग हे तिघे एजंट असल्याने त्यांची १० लाखाची दलाली के. सरा सरा कंपनीकडून परवीन कुमार सिंग यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आली. दलालीतील दोन हिस्से हबीब व खान यांचे असल्याने ते देण्यास परवीनने टाळाटाळ केली असता खान व हबीब हे ११ ऑक्टोबर २०२२ रोजी परवीनकडे गेले.

त्यावेळी परवीनने खान व हबीब यांच्या हिश्याची दलाली देण्यास नकार दिल्याने खान यांनी परवीनच्या कानाखाली दोन चापट मारल्या. याविरोधात परवीनने मीरारोड पोलीस ठाण्यात १२ ऑक्टोबर २०२२ रोजी खान व हबीब विरोधात भादंविसं मधील कलम ३२३, ३२४, ३६३, ५०४, ५०६ व ३४ अन्वये गुन्हा दाखल केला. यानंतर हबीब वगळता खान यांना १३ ऑक्टोबर २०२२ पासून मीरारोड पोलीस ठाण्यातील गुन्हे शाखा तसेच इतर विभागातील पोलिस कर्मचारी वेगवेगळया मोबाईलवरुन फोन करून पोलीस ठाण्यात तसेच गुन्हे शाखा येथे येवून तडजोडीद्वारे दाखल गुन्ह्यामधून बाहेर काढण्याबाबत सांगत होते. यानंतर गुन्ह्याचे तपास अधिकारी तथा सहाय्यक पोलीस निरीक्षक व त्यांचे रायटर यांनी हबीब याच्या मोबाईलवरुन व्हॉट्सअॅप कॉलद्वारे दाखल गुन्ह्यातील अटक टाळण्यासाठी तीन लाख रुपये लाच देण्याची मागणी केली.

हि रक्कम जास्त असल्याने खान यांनी रक्कम कमी करण्यास सांगितले असता तडजोडीअंती दीड लाख रुपये निश्चित करण्यात आले. यांनतर हि रक्कम ५० हजारांनी वाढून २ लाख रुपयांची लाच हबीबमार्फत मागणी करण्यास सुरुवात झाली. यात सहा. पोलीस निरीक्षक व रायटर खेरीज खान यांचे सतत हबीबसोबतच संभाषण होत असल्याने सहा. पोलीस निरीक्षक व रायटर यांचा खान यांच्याशी थेट संपर्क झाला नाही. दरम्यान खान यांनी १४ ऑक्टोबर २०२२ रोजी ठाणे एसीबीकडे सहा. पोलीस निरीक्षक व रायटरसह हबीब यांच्याविरोधात तक्रार दाखल केली.

एसीबीने अनेकदा या तिघांना रंगेहाथ पकडण्यासाठी सापळा रचला. पण सहा. पोलीस निरीक्षक व रायटर समोर येत नसल्याने हबीबच त्याचे डिल करीत राहिला. अखेर हबीबच्या सततच्या लाचेच्या मागणीवरून ठाणे एसीबीच्या उप अधिक्षक अश्विनी पाटील यांच्या नेतृत्वाखालील पथकाने १० जानेवारी रोजी हबीब विरोधात काशिमीरा पोलीस ठाण्यात लाचेची मागणी केल्याचा गुन्हा दाखल करून त्याला अटक केली.

त्याच्या चौकशीतून लाच मागण्यात कोणाकोणाचा समावेश होता ते उघड होणार आहे. मात्र याप्रकरणामुळे काशिमीरा, भाईंदर परिसरात खळबळ उडाली आहे.

← पुढारी पु-पा-९.

पुढारी पु-पा-१.

पुण्यनगरी पु-पा-१.

# वाहतूक नियम मोडणाऱ्यांना काशिमीरा वाहतूक पोलिसांचा दणका

## ५ कोटींचा दंड वसूल; वर्षभरात सव्वा लाख वाहनांवर कारवाई

**मिरारोड : पुढारी वृत्तसेवा**

काशिमीरा वाहतूक पोलिसांकडून २०२२ या पूर्ण वर्षभरात मीरा भाईंदर शहरात वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकांवर कारवाई करण्यात आली आहे. कारवाईचा आकडा ५ कोटींवर पोहोचला आहे. वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांचे दंड भरून घेत वाहतूक शाखेकडून समुपदेशन केले जात आहे. शहरातील वाहन चालकांनी वाहतूक नियमांचे पालन करावे अन्यथा त्यांच्यावर कायदेशीर कारवाई केली जाईल असे वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रमेश भामे यांनी सांगितले आहे. काशिमीरा वाहतूक विभागाकडून सन २०२२ मध्ये १,२४,४७६ नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकांवर कारवाई केली असून ५,०८,९१,००० रुपये इतका दंड आकारण्यात आलेला आहे. तसेच १,४६१ वाहन चालकाचे अनुज्ञाती चालक परवाना निलंबनाबाबतचा प्रस्ताव देखील आर.टी.ओ. कडे पाठवण्यात आला आहे. विना हेल्मेट मोटार सायकल चालवणाऱ्या चालविणे २,३३४ वाहन चालकांवर कारवाई करून रुपये ८,५३,००० रुपये दंड आकारण्यात आला आहे. वर्षभरात मद्यप्राशन करून वाहन चालविणे कलम १८५ प्रमाणे एकूण २४९ वाहन चालकांवर कारवाई करून कोर्टात एकूण ४,९५,३०० इतका दंड आकारण्यात आलेला आहे. वर्षाच्या शेवटी एक आठवडा विशेष मोहीम राबवुन ९९ वाहन चालकांवर कारवाई करत कोर्टात दंड भरण्यासाठी पाठवण्यात आले आहे. मीरा- भाईंदर शहरात अवैध प्रवासी वाहतुक परवाना उल्लंघन करणाऱ्या एम.एम.व्हि.आर ६६(१)/१९२ (अ) प्रमाणे एकुण ३०२ वाहन चालकांवर कारवाई करत २७,९०,००० इतका दंड आकारण्यात आलेला आहे. सिटबेल्ट न लावणाऱ्यावर कलम १९४ (बी) (१) प्रमाणे एकुन २७,४६५ वाहन चालकांवर कारवाई करत त्यांच्या कडुन ५४,९१,२०० रुपये इतका दंड आकारण्यात आलेला आहे. गेल्या वर्षभरात जवळपास सव्वा लाख वाहन चालक यांच्यावर कारवाई करत दंड वसूल करण्यात आला आहे. त्यामुळे शहरातील ८५% वाहनचालकांनी वाहतूक नियमांचे पालन करण्यास सुरवात केली असल्याचे निदर्शनास आले आहे. वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्याचे समुपदेशन करण्यात येत असून त्यांनी इतरांना देखील वाहतूक नियमांचे धडे देण्यात येत जनजागृती होत असल्याचे पोलिसांनी सांगितले.



## शिजान खानच्या जामीन अर्जावर १३ जानेवारीला निर्णय

। नालासोपारा : अभिनेत्री तुनिषाच्या आत्महत्येचा आरोप तिचा मित्र शिजान खान याच्यावर असून, त्याच्या जामीन अर्जावर दोन्ही पक्षांकडील वकिलांनी बुधवारी युक्तिवाद केला. मात्र, या जामीन अर्जाचा निकाल शुक्रवार, १३ जानेवारी रोजी जाहीर केला जाणार आहे. आरोपीच्या वकिलांनी तो तुनिषाचा फक्त मित्र होता. शिजान खानने आपला वापर केला आणि फसवल्याचे तिने आईला सांगितले होते. दरम्यान, जामीन दिल्यास तपासात अडथळा निर्माण होईल. आरोपीचा मोबाईल तपासणीसाठी पाठवला आहे. घटनेचे ठिकाण आणि उपचारासाठी २५ मिनिटांच्या अंतरावर का नेले..? जवळच्या दवाखान्यात का नेले नाही..? ब्रेकअपमुळेच आत्महत्या केली. असा आरोप तुनिषाच्या वकिलांनी केला होता. त्यामुळे शिजान खानला बुधवारी जामीन मिळाला नाही. जाहीर होणार आहे.

लोकमत पा-नं. २.

# पोलिस अधिकारीच करतोय दारू तस्करी

## उपनिरीक्षकासह चौघांवर गुजरातमध्ये गुन्हा दाखल

लोकमत न्यूज नेटवर्क

तलासरी : महाराष्ट्रात दमण बनावटीच्या दारूची आयात करणाऱ्या अनेक टोळ्या कार्यरत आहेत. महाराष्ट्रात बंदी असलेल्या दारूची तस्करी करणाऱ्या टोळीचा गुजरात पोलिसांनी पर्दाफाश केला असून, यात तलासरी पोलिस ठाण्याच्या पोलिस अधिकाऱ्याचा समावेश असल्याने एकच खळबळ उडाली आहे. याबाबत गुजरातमधील भिलाड पोलिस ठाण्याला गुन्ह्याची नोंद करण्यात आली असून, यात दोघांना अटक करण्यात आली आहे.

फरार पोलिस अधिकाऱ्यासह दोघांचा तपास गुजरात पोलिस करीत असून, याबाबत पालघर पोलिस अधीक्षक काय कारवाई करतात, याकडे साऱ्यांचे लक्ष लागले आहे. तलासरी भागातून गुजरातमधील सुरत येथे दारू जात असल्याची खबर गुजरातच्या गुन्हे अन्वेषण विभागाला लागल्याने त्यांनी ६ जानेवारी रोजी सापळा रचून कारवाई केली होती. तलासरी भागातून गाडीत भरून जाणाऱ्या कारमधील ५५१ बाटल्या पकडण्यात आल्या होत्या. यावेळी गुजरात पोलिसांनी कारमधील नवीन



गुजरात पोलिसांनी पाच दिवसांपूर्वी सापळा रचून तलासरीतून सुरत येथे जाणारा दारूचा साठा पकडला होता.

> गुजरात पोलिसांकडून माहिती मिळाली आहे, मात्र अहवाल मिळालेला नाही, अहवाल मिळाल्यावर सत्यता पडताळून कारवाई केली जाईल.
> **- बाळासाहेब पाटील, पोलिस अधीक्षक, पालघर**

रणछोडभाई वरिया, तसेच नीरव उर्फ पिंटू मधुसूदन देसाई या दोघांना ताब्यात घेतले असता त्यांनी गाडीमधील दारू तलासरी पोलिस ठाण्याचे उपनिरीक्षक धांगडे, तसेच त्यांचा एक माणूस याने सुरतमधील अर्जुनभाई नावाच्या व्यक्तीस पोहोचवायची आहे, असे सांगितले.

यावरून गुजरात पोलिसांच्या गुन्हे अन्वेषण विभागाच्या अधिकाऱ्यांनी भिलाड पोलिस ठाण्याला गुन्हा दाखल करून फरार आरोपींचा शोध सुरू केला आहे. तलासरी पोलिस ठाण्याचे उपनिरीक्षक धांगडे याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाल्याचे गुजरात पोलिसांनी पालघर पोलिस अधीक्षकांना कळविले आहे.

गुन्हा दाखल होऊन दारू तस्करीचा आरोप असलेले उपनिरीक्षक धांगडे सध्या आजारपणाच्या रजेवर आहेत. त्यांच्यावर कारवाई होणार का याकडे लक्ष लागले आहे.

लोकमत पा.नं.८.

# पोलिसांची शेतकऱ्यांवर लाठी

## संतप्त ग्रामस्थांनी अनेक वाहने जाळली; बिहारच्या बक्सरमध्ये तणाव

**लोकमत विशेष**

एस. पी. सिन्हा
लोकमत न्यूज नेटवर्क

पाटणा : बिहारच्या बनारपूर (जि. बक्सर) गावाजवळ औष्णिक वीज प्रकल्पासाठी भूसंपादनाच्या मोबदल्यासाठी शेतकरी ८५ दिवसांपासून करत असलेल्या आंदोलनाला बुधवारी हिंसक वळण लागले. मंगळवारी रात्री बक्सर पोलिसांनी आंदोलक शेतकऱ्यांच्या घरांवर लाठीहल्ला केला. त्यामुळे अनेक ग्रामस्थ जखमी झाले. त्यानंतर बुधवारी सकाळी ग्रामस्थांच्या संतापाचा उद्रेक झाला.

ग्रामस्थांनी वीज केंद्रावर लाठ्या-रॉडने हल्ला केला. पोलिसांच्या १३ वाहनांची तोडफोड आणि जाळपोळ करण्यात आली. पोलिसांनी हवेत गोळीबार करून जमावाला पांगविण्याचा प्रयत्न केला. दोन्ही बाजूंनी दगडफेकही झाली. यामध्ये चार पोलिस जखमी झाले आहेत.

ग्रामस्थांनी लाठ्या-काठ्या घेऊन प्रकल्पावर हल्ला केला. जमावाने पोलिसांची दोन वज्र वाहने, तीन बाईक, तीन कंपनीच्या बस, तीन फायर इंजिन, एक रुग्णवाहिका आणि एक क्रेन जाळली. त्यानंतर पोलिसांचा मोठा फौजफाटा तैनात करण्यात आला.



पोलिसांनी लाठीमार केल्यानंतर ग्रामस्थांनी पोलिसांनी वाहने पेटवून दिली.

**१३**
पोलिस वाहनांची शेतकऱ्यांकडून जाळपोळ आणि तोडफोड केली.

### ८५ दिवसांपासून आंदोलन

**१** गेल्या ८५ दिवसांपासून शेतकरी आंदोलन करत आहेत. मंगळवारी शेतकऱ्यांनी प्रकल्पाच्या मुख्य द्वाराला कुलूप लावून धरणे धरले.

**२** त्यावेळी पोलिसांनी काहीही केले नाही, मात्र रात्री पोलिसांनी बनारपूर गावात घुसून बेदम मारहाण केली. चारजणांना अटक करण्यात आली. पोलिसांच्या या मारहाणीच्या निषेधार्थ बुधवारी सकाळी लोकांचा रोष उसळला.



### नितीश सरकार 'गुंडाराज'

बक्सर येथील घटनेनंतर बिहारचे राजकारण चांगलेच तापले आहे. विधानसभेतील विरोधी पक्षनेते विजयकुमार सिन्हा यांनी शेतकऱ्यांवर झालेल्या मारहाणीनंतर नितीश सरकारला 'गुंडाराज' म्हटले आहे.

■ संपूर्ण बिहारमध्ये गुंडाराज आले आहे. आता घरोघरी जाऊन महिलांना मारहाण केली जात आहे. यात सुशासन कुठे आहे? बिहारमध्ये जंगलराज, गुंडाराज पुन्हा परतल्याचेच हे निदर्शक आहे.

### पोलिसांचा अमानवी चेहरा समोर

■ बनारपूर गावाजवळ औष्णिक वीज प्रकल्प उभारला जात आहे. शेतकऱ्यांच्या जमिनी ताब्यात घेण्यास ग्रामस्थांचा विरोध आहे. या पार्श्वभूमीवर बनारपूरमध्ये पोलिसांचा अमानवी चेहरा समोर आला. येथील घरात घुसून रात्री १२ वाजता झोपलेल्या शेतकऱ्यांवर पोलिसांनी लाठीमार केला.

■ शेतकऱ्यांना वाचवण्यासाठी आलेल्या महिला आणि लहान मुलांनाही पोलिसांकडून मारण्यात करण्यात आली. शेतकऱ्यांवर पोलिसांच्या अत्याचाराचा एक व्हिडीओही समोर आला आहे, ज्यामध्ये पोलिस बेदम मारहाण करताना दिसतात.

■ शेतकऱ्यांच्या संतप्त प्रतिक्रियेनंतर परिसराला पोलिस छावणीचे स्वरूप आले आहे.

सकाळ पु.प.१.

# पोलिस भरतीच्या उमेदवारांना निवारा

## राहण्याची सोय नसलेल्यांना मिरा-भाईंदर महापालिकेने उपलब्ध केला पर्याय

भाईंदर, ता. ११ (बातमीदार) : मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलिस आयुक्तालयासाठी सध्या भरती प्रक्रिया सुरू आहे. या भरतीसाठी राज्यातील विविध जिल्ह्यांतून उमेदवार येत आहेत. या उमेदवारांची राहण्याची सोय करण्यात आलेली नसल्यामुळे त्यांना रस्त्याच्या कडेला अथवा मैदानात आडोशाला रात्र काढावी लागत आहे. सध्या गेल्या काही दिवसांपासून थंडी वाढत असल्यामुळे उमेदवारांची गैरसोय होत आहे. ही अडचण लक्षात घेऊन मिरा-भाईंदर महापालिकेने उमेदवारांना रात्रीची झोपण्याची व्यवस्था उपलब्ध करून दिली आहे.



भाईंदर : पोलिस भरतीसाठी आलेले उमेदवार रस्त्याच्या कडेला अथवा मैदानात विश्रांती घेत आहेत.

### येथे केली सुविधा

पालिकेने ज्या उमेदवारांची राहण्याची सोय नाही अशा उमेदवारांना भाईंदर पश्चिम येथील नगर भवन सभागृह तसेच राई गावातील महापालिकेच्या इमारतीमधील पहिल्या मजल्यावरील सभागृह उपलब्ध करून दिले आहे. उमेदवारांची याठिकाणी रात्रीच्या वेळी झोपण्याची व्यवस्था करण्यात आली असल्याचे महापालिकेकडून पोलिस आयुक्तालयाला कळविण्यात आले आहे.

भाईंदर पश्चिम येथील नेताजी सुभाषचंद्र बोस मैदान याठिकाणी पोलिस भरतीसाठी चाचणी प्रक्रिया सुरू आहे. यात ९९६ पोलिस शिपाई पदांसाठी ७३ हजारांहून अधिक अर्ज आले आहेत. सकाळी साडेपाच वाजल्यापासून चाचणी प्रक्रिया सुरू होत असून त्यात सोळाशे व आठशे मीटर धावणे व गोळाफेक या चाचण्या घेतल्या जात आहेत. एका दिवशी सुमारे पाचशे ते एक हजार उमेदवारांची चाचणी घेतली जात आहे. पहिल्या टप्प्यात पुरुष उमेदवारांची चाचणी सुरू आहे. चाचणीसाठी येणाऱ्या उमेदवारांसाठी पोलिस विभागाकडून पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे तसेच खाद्यपदार्थांचे स्टॉल आदी सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. मात्र उमेदवारांना राहण्याची कोणतीही सुविधा देण्यात आलेली नाही.

चाचणी सकाळी लवकर सुरू होत असल्यामुळे उमेदवार आदल्या दिवशी रात्रीपासूनच मुक्कामाला येत आहेत, पण ज्या उमेदवारांची राहण्याची कोणतीही सुविधा नाही त्यांना रात्रीच्या वेळी रस्त्याच्या कडेला एखाद्या आडोशाला, मैदानातच झाडाझुडपांच्या शेजारी, तसेच मैदानात असलेल्या पाण्याच्या टाकीखाली निवारा शोधावा लागत आहे. गेल्या काही दिवसांपासून थंडी वाढत आहे. त्यामुळे रात्रीच्या वेळी उघड्यावर झोपणे उमेदवारांना त्रासदायक ठरत आहे. रात्री झोप नीट मिळाली तर सकाळी चाचणीची योग्य तयारी होऊ शकेल, असे एका उमेदवाराने नाव न छापण्याच्या अटीवर सांगितले. उमेदवारांच्या या अडचणीची महापालिकेकडून दखल घेण्यात आली आहे. त्यानुसार उमेदवारांना राहण्यासाठी निवाऱ्याची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे.

---

# नवजात बालकावरील चुकीच्या उपचार प्रकरणात रुग्णालयाला दिलासा

लोकसत्ता प्रतिनिधी

← लोकसत्ता पु.प.१.

**विरार :** नालासोपारा परिसरात एका नवजात बालकावर चुकीचा उपचार केल्याने या बालकाला आपला हात गमवावा लागल्याप्रकरणी रुग्णालयाला 'क्लीन चिट' देण्यात आली आहे. बाळाला आनुवंशिक रक्तदोष असल्याने त्याला आपला हात गमवावा लागला, अशी माहिती या अहवालात देण्यात आली असल्याचे पोलिसांनी सांगितले आहे.

### 'अहवाल चुकीचा, दाद मागणार'

बाळाची आई अंजली वाला यांनी हा अहवाल चुकीचा असून प्रशासनाकडून डॉक्टराला वाचविण्याचा प्रयत्न केला जात आहे. माझ्या दुसऱ्या मुलातही हा रक्तदोष असल्याचे सांगितले जाते; पण माझी दोनही मुले स्वस्थ असून त्यांच्यात कोणतेही दोष नाहीत. डॉक्टरांनी असे कोणतेही अहवाल दिले नसून केवळ त्रिवेणी रुग्णालयाला वाचविले जात आहे. आम्ही गरीब असल्याने महागड्या चाचण्या करू शकत नाहीत; पण लवकरच या अहवालाच्या विरोधात आम्ही दाद मागणार असल्याचे त्यांनी 'लोकसत्ता'शी बोलताना सांगितले.

नालासोपाऱ्यातील अंजली वाला या येथील खासगी रुग्णालय त्रिवेणी येथे ४ नोव्हेंबर २०२२ रोजी प्रसूतीसाठी दाखल झाल्या होत्या. त्यांनी दोन जुळ्या मुलांना जन्म दिला. या वेळी दोनही बालके निरोगी असल्याचे येथील डॉक्टरांनी सांगितले. मात्र एका बाळाची शुगर कमी असल्याचे सांगत डॉक्टरांनी त्याला सलाइन लावले आणि त्याचा उजवा हात काळा पडत गेला. याबाबत अंजली वाला यांनी डॉक्टरांना विचारणा केली असता त्यांनी मालीश करून जाईल, असे सांगितले; पण बाळाच्या तब्येतीत काहीच सुधारणा होत नसल्याने पालकांनी त्याला मुंबईच्या वाडिया रुग्णालयात नेले. या वेळी बाळाच्या हाताला गँगरिन झाला असल्याचे सांगत बाळाचा हात निकामी झाल्याचे सांगितले. यामुळे या बाळाचा उजवा हात कापण्यात आला होता. पालकांनी या प्रकरणी नालासोपारा पोलीस ठाण्यात डॉक्टरांवर चुकीचा उपचार केल्याचा आरोप केला होता. त्यानुसार नालासोपारा पोलिसांनी या प्रकरणी जिल्हा शल्यचिकित्सक यांचा अहवाल मागवला होता.

तब्बल दोन महिन्यांनी पोलिसांना अहवाल सादर करत रुग्णालयावरील आरोप चुकीचे असल्याचे सांगितले. नालासोपारा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विलास सुपे यांनी सांगितले की, अहवाल नकारात्मक असून त्यात रुग्णालयाचा कोणताही दोष आढळून आला नाही. याबाबत मुलाच्या पालकांना माहिती देण्यात आली आहे.

हर खबर पर नजर है गहरी, हम है आज के प्रहरी, सच्ची खबर आपतक

RNI No.: DELHIN/2021/81851

राष्ट्रीय व अंतरराष्ट्रीय खबर

दैनिक राष्ट्रीय हिन्दी समाचार पत्र, नई दिल्ली से प्रकाशित

# आज का प्रहरी

संपादक : संतोष दूबे

भारतीय जीवन बीमा निगम
LIFE INSURANCE CORPORATION OF INDIA


आयुक्त आरपीसिंह नें गढ़ी नीति स्वरोजगार कैसे बनें विकास की रीढ़ 2


नायगांव पूर्व मे ब्राह्मण सेना का परिचय सम्मेलन संपन्न 4


स्वामी विवेकानंद जी के सपनों को साकार करने के उद्देश्य से 12 जनवरी को एक दौड़ राष्ट्र के नाम का होगा आयोजन 8

वर्ष -3 अंक - 11 | दिल्ली, बुधवार 12 जनवरी 2023 | पृष्ठ: 8 मूल्य : 5 रुपए

# अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्ष नालासोपारा का सराहनीय कार्य

■ आज का प्रहरी

प्रेम चौबे /वसई ; वर्ष 2022 में मीरा भाईदर- वसई विरार पुलिस आयुक्तालय अंतर्गत अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध नालासोपारा सेल द्वारा कई घरों के परिवार को बिछड़ने से बचाया गया है,दरअसल बाल अपहरण के कुल 106 मामलों का पता लगाने व उनके परिजनों को सही सलामत सौंप देने का सराहनीय कार्य सेल द्वारा किया गया है। बच्चों को परिवार से मिलते ही उनकें चेहरों पर खुशीयाँ चमक उठी जानकारी के अनुसार,अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध नालासोपारा सेल के माध्यम से अपहृत बच्चों से संबंधित अपराधों की जांच, इस बीच, मीरा-भाईदर, वसई-विरार पुलिस आयुक्तालय के वसई-विरार अंतर्गत पुलिस स्टेशन 2 और 3 में बाल अपहरण के दायर मामलों में




वरिष्ठों के मार्गदर्शन में उक्त सेल द्वारा वर्ष 2022 में एक अंतिम जांच की गई, बच्चों के अपहरण के मामले दर्ज होते ही अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध नालासोपारा सेल के पुलिस अधिकारी व कर्मचारियों ने तकनीकी और अन्य जानकारी के आधार पर त्वरित कार्रवाई करते हुए,वर्ष 2022 में कुल 106 अपराध के मामले प्रकाश मे आए जिसमें 38 लड़के और 74 लड़कियों समेत कुल112 बच्चों को बरामद कर संबंधित जांच अधिकारियों को सौंप कर उनके माध्यम से उनके माता-पिता को सौंप दिया गया है।इसके अलावा, वर्ष 2022 में, अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध नालासोपारा सेल के पुलिस अधिकारियों व कर्मचारियों ने अवैध वेश्यावृत्ति के संबंध में अनैतिक व्यापार निवारण अधिनियम,1956 के तहत कुल 18 कार्रवाई की,तथा 23 अभियुक्तों के विरुद्ध कार्रवाई की जिसमें 23 महिलाओं एवं 07 नाबालिग लड़कियों को देह व्यापार से मुक्त कराया गया है। नारकोटिक्स एक्ट के तहत 02 मामले, बाल श्रम अधिनियम के तहत 07 मामले संबंधित 11 आरोपियों के खिलाफ कार्रवाई की गयी है 17 बच्चों को रिहा किया गया है। साथ ही कुल 04 फर्जी चिकित्सकों पर कार्यवाही एवं कुल 03 अभियुक्तों के विरूद्ध मुकदमा दर्ज की गयी थी। उक्त कार्य में डीसीपी (क्राइम ) अविनाश अंबुरे, ए.सी.पी अमोल मांडवे के मार्गदर्शन में अनैतिक मानवी वाहतुक नालासोपारा सेल के पी.आई संतोष चौधरी व पुलिस उपनिरीक्षक प्रकाश निकम की टीम ने सफलता पायी है।

लोकमत

# अल्पवयीन मुलीवर बलात्कार

**नालासोपारा :** नालासोपारा येथे १५ वर्षीय अल्पवयीन मुलीवर बलात्कार केल्याची संतापजनक घटना समोर आली आहे. नालासोपारा परिसरात राहणाऱ्या पीडित मुलीच्या अज्ञानपणाचा फायदा घेत मे २०२२ पासून ओळखीच्या तरुणाने तिच्यावर लैंगिक अत्याचार केला होता. त्यातून पीडित मुलीला दिवस गेल्यानंतर घरच्यांना या घटनेची माहिती मिळाली. मुलीच्या आईने मंगळवारी आचोळे पोलिस ठाण्यात आरोपीविरोधात तक्रार देऊन बलात्कारासह पोक्सोचा गुन्हा दाखल केला आहे.

Mumbai Main
Page No. 4 Jan 12, 2023
Powered by: erelego.com

लोकमत

# 'अली हा तुनीषाचा मित्र, जिम ट्रेनर'

## शिजानच्या जामिनावर उद्या सुनावणी

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा** : दोन दिवसांपूर्वी शिजान खानच्या वकिलांनी न्यायालयात दावा केलेला अली हा तुनीषाचा जिम ट्रेनर असल्याचा व ते दोघे चांगले मित्र असल्याचा दावा तिची आई वनिता यांनी केला आहे. दरम्यान, तुनीषाच्या आत्महत्येप्रकरणी तुरुंगात असलेल्या अभिनेता शिजान खानच्या जामीन अर्जावरील सुनावणी न्यायालयाने दोन दिवस पुढे ढकलली असून, ती आता १३ जानेवारीला होईल.

१२ दिवसांपासून शिजान खान हा ठाण्याच्या मध्यवर्ती तुरुंगात आहे. तो तुनीषाचा सहकलाकार आणि एकेकाळचा प्रियकर आहे. त्याला वसई न्यायालयाने १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली होती. दरम्यान, टीव्ही अभिनेत्री तुनीषा शर्मा आत्महत्या प्रकरणात ९ जानेवारीला शिजान खानचे वकील शैलेंद्र मिश्रा यांनी वसई न्यायालयात दावा केला होता की, शिजानसोबत ब्रेकअप झाल्यानंतर तुनीषा अली नावाच्या व्यक्तीच्या संपर्कात होती. तिची भेट टिंडर या डेटिंग ॲपवर झाली होती. आत्महत्येपूर्वी १५ मिनिटे ती अलीशी व्हिडीओ कॉलवर बोलली होती, असाही दावा त्यांनी केला. मात्र, तुनीषाच्या आईने या वृत्ताचे खंडन केले.

> आता या खटल्याची सुनावणी १३ जानेवारीला होणार आहे. तुनीषाच्या आईने दोन महिन्यांपूर्वी दोन ते तीन लाख रुपये दिल्याचा आरोप केला आहे. आता पैशांचीही चौकशी होणार आहे.
>
> - **तरुण शर्मा**, तुनीषाचे वकील

> शिजानला १३ जानेवारीला जामीन मिळेल. त्याची अटक बेकायदा आहे. २३ डिसेंबरला जर वनिता शर्मा यांनी शिजानच्या म्हणण्यावर कृती केली असती आणि योग्य पावले उचलली असती, तर आज परिस्थिती वेगळी असती.
>
> - **शैलेंद्र मिश्रा**, आरोपी शिजानचे वकील

वनिता म्हणाल्या, तुनीषाने मला फोन करून सांगितले होते की, ती जिम ट्रेनर अलीला भेटते. तीन महिन्यांपूर्वी तो तिचा जिम ट्रेनर होता. मृत्यूच्या तीन दिवस आधी ती त्याच्यासोबत जेवायला गेली होती आणि गप्पाही मारत होती. ते फक्त मित्र होते आणि डिसेंबरमध्ये तीनवेळा भेटले. तुनीषाने मला अलीसोबत एक मित्र म्हणून भेटत असल्याबद्दल सांगितले होते. दि. २१, २२ आणि २३ डिसेंबरला माझी मुलगी घरी परतली नसल्याचा दावा शिजानच्या वकिलाने केला; पण हे खरे नसल्याचे तिच्या आईने सांगितले.

Mumbai Main
Page No. 4 Jan 12, 2023
Powered by: erelego.com

लोकमत

# रखडलेल्या पोलिसांच्या बदल्यांना अखेर मुहूर्त

## १२ पोलिस निरीक्षकांच्या अंतर्गत बदल्या

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : पोलिस निरीक्षकांच्या रखडलेल्या बदल्यांना अखेर मुहूर्त मिळाला असून मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलिस आयुक्तालयाच्या १२ पोलिस निरीक्षकांच्या अंतर्गत बदल्या मंगळवारी करण्यात आल्या आहेत. बाहेरून बदली होऊन आलेल्या दोन अधिकाऱ्यांची आस्थापनेवर नेमणूक केली असून, या सर्व बदल्या आणि नियुक्त्या पोलिस उपायुक्त प्रकाश गायकवाड यांच्या आदेशाने झाल्या आहेत.

पोलिस आयुक्तालय सुरू होऊन सव्वादोन वर्षांचा कालावधी झाला आहे. पोलिस आयुक्तालयांतर्गत कार्यरत अनेक वरिष्ठ पोलिस निरीक्षक, सहायक निरीक्षक व उपनिरीक्षकांचा कार्यकाळ पूर्ण झालेला आहे. यातील वरिष्ठ पोलिस निरीक्षकांच्या बदल्या मंगळवारी रात्री करण्यात आल्या आहेत.

पोलिस ठाण्यात साधरणत: दोन वर्षे व अन्य शाखेत तीन वर्षे कार्यकाळ पूर्ण झालेला अधिकारी बदलीस पात्र असतो. पोलिस ठाणे व अन्य शाखेत कार्यकाळ पूर्ण झाल्यानंतर अजूनही या



### दोन अधिकारी नियंत्रण कक्षात

पेल्हार पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक वसंत लब्दे यांच्याकडेच कार्यभार ठेवण्यात आला आहे, तसेच पुणे ग्रामीण येथून आलेले पोलिस निरीक्षक अरविंद चौधरी आणि मुंबई शहर येथून आलेले पोलिस निरीक्षक प्रवीण कदम यांना आस्थापनेवर हजर करून घेतले असून पुढील आदे होईपर्यंत तात्पुरत्या स्वरूपात नियंत्रण कक्ष येथे नेमणूक केली आहे.

अधिकाऱ्यांची बदली झालेली नाही. तत्कालीन पोलिस आयुक्त सदानंद दाते यांच्यासह काही अधिकाऱ्यांच्या बदल्या करणार असल्याची चर्चा सर्वत्र सुरू होती; पण त्यांनी कोणत्याही अधिकाऱ्यांची बदली केली नाही. नव्याने आलेले पोलिस आयुक्त मधुकर पांडेय हे तत्काळ बदल्या करतील; पण असे झाले नाही. त्यांनी २६ दिवसांनंतर १२ पोलिस निरीक्षकांच्या अंतर्गत बदल्या केल्या आहेत.

पोलिस निरीक्षक देवीदास हंडोरे (अंली पदार्थविरोधी पथक) यांची काशीमिरा वाहतूक शाखेत, संदीप कदम (नियंत्रण कक्ष) यांची काशीमिरा पोलिस ठाणे, दादाराम कारंडे (विरार वाहतूक शाखा) यांची उत्तन पोलिस ठाणे, प्रशांत लांगी (उत्तन पोलिस ठा यांची विरार वाहतूक शाखेत, संज हजारे (काशीमिरा पोलिस ठाणे) यां परवाना शाखेत, रणजित आंध (परवाना शाखा) यांची वसई पोलि ठाणे, राजेंद्र कांबळे (तुळींज पोलि ठाणे) यांची विरार पोलिस ठा शैलेंद्र नगरकर (नियंत्रण शाखा) यां तुळींज पोलिस ठाणे, कल्याणराव क (वसई पोलिस ठाणे) यांची अर्ना पोलिस ठाणे, सुरेश वराडे (वि पोलिस ठाणे) यांची विशेष शाखे अमर मराठे (पेल्हार पोलिस ठा यांची अमली पदार्थविरोधी पथक, र माने (अर्नाळा पोलिस ठाणे) यां नियंत्रण शाखेत बदली करण्य आली आहे.

# साल 2022 : अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध नालासोपारा सेल ने किया बेहतर कार्य, 17 बच्चों को रिहा किया

**अजहर शेख : संवाददाता**

वसई : वर्ष २०२२ में मीरा भाईंदर- वसई विरार पुलिस आयुक्तालय अंतर्गत अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध नालासोपारा सेल ने कई घरों के चिराग व परिवार से बिछड़ने से बचाया है, दरअसल सेल ने बाल अपहरण के कुल १०६ मामलों का पता लगाने में सफल रही व उनके परिजनों को सही सलामत सौंप दिया गया है, जहां परिवार के चेहरों पर खुशी की रौनक दौड़ पड़ी। जानकारी के अनुसार, अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध नालासोपारा सेल के माध्यम से अपहृत बच्चों से संबंधित अपराधों की जांच, इस बीच, मीरा-भाईंदर, वसई-विरार पुलिस आयुक्तालय के वसई-विरार सर्किल के पुलिस स्टेशन २ और ३ में दायर बाल अपहरण के मामलों में वरिष्ठों के मार्गदर्शन में उक्त सेल द्वारा वर्ष २०२२ में एक अंतिम जांच की गई, बच्चों के अपहरण के मामले दर्ज होते ही अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध नालासोपारा सेल के पुलिस अधिकारी व कर्मचारियों ने तकनीकी और अन्य जानकारी के आधार पर त्वरित कार्रवाई करते हैं। वर्ष २०२२ में कुल १०६ अपराध प्रकाश में लाए गए हैं। ३८ लड़के और ७४ लड़कियों समेत कुल ११२ बच्चों को बरामद कर संबंधित जांच अधिकारियों को सौंप कर उनके माध्यम से उनके माता-पिता को सौंप दिया गया है। इसके अलावा, वर्ष २०२२ में, अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध नालासोपारा सेल के पुलिस अधिकारियों व




कर्मचारियों ने अवैध वेश्यावृत्ति के संबंध में अनैतिक व्यापार निवारण अधिनियम,१९५६ के तहत कुल १८ कार्रवाई की, तथा २३ अभियुक्तों के विरुद्ध कार्रवाई कर कुल २३ महिलाओं एवं ०७ नाबालिग लड़कियों को देह व्यापार से मुक्त कराया गया है, नारकोटिक्स एक्ट के तहत ०२ मामले, बाल श्रम अधिनियम के तहत ०७ मामले और ११ आरोपियों के खिलाफ कार्रवाई की गई है और कुल १७ बच्चों को रिहा किया गया है। साथ ही कुल ०४ फर्जी चिकित्सकों पर कार्यवाही एवं कुल ०३ अभियुक्तों के विरूद्ध मुकदमा दर्ज की गयी थी। उक्त सफलता डीसीपी (क्राइम) अविनाश अंबुरे, ए.सी.पी अमोल मांडवे के मार्गदर्शन में अनैतिक मानवी वाहतुक नालासोपारा सेल के पी.आई संतोष चौधरी व पोउपनिरी प्रकाश निकम की टीम ने पाई है।

1997 से

KAT खबरें आज तक

not a publication of the living media india group

वर्ष: 26 अंक-209 मुंबई, गुरुवार 12 जनवरी 2023 पृष्ठ-12 मूल्य : 2.00

# सैकड़ों बाल अपहरण की गुत्थी सुलझाई व 30 महिलाओं को देह व्यापार से कराया गया मुक्त




मुकेश त्रिपाठी

**वसई;** वर्ष 2022 में मीरा भाईंदर-वसई विरार पुलिस आयुक्तालय अंतर्गत अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध नालासोपारा सेल ने कई घरों के चिराग व परिवार से बिछड़ने से बचाया है, दरअसल सेल ने बाल अपहरण के कुल 106 मामलों का पता लगाने में सफल रही व उनके परिजनों को सही सलामत सौंप दिया गया है, जहां परिवार के चेहरों पर खुशी की रौनक दौड़ पड़ी।जानकारी के अनुसार, अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध नालासोपारा सेल के माध्यम से अपहृत बच्चों से संबंधित अपराधों की जांच, इस बीच, मीरा-भाईंदर, वसई-विरार पुलिस आयुक्तालय के वसई-विरार सर्किल के पुलिस स्टेशन 2 और 3 में दायर बाल अपहरण के मामलों में वरिष्ठों के मार्गदर्शन में उक्त सेल द्वारा वर्ष 2022 में एक अंतिम जांच की गई, बच्चों के अपहरण के मामले दर्ज होते ही अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध नालासोपारा सेल के पुलिस अधिकारी व कर्मचारियों ने तकनीकी और अन्य जानकारी के आधार पर त्वरित कार्रवाई करते हैं। वर्ष 2022 में कुल 106 अपराध प्रकाश में लाए गए हैं। 38 लड़के और 74 लड़कियों समेत कुल 112 बच्चों को बरामद कर संबंधित जांच अधिकारियों को सौंप कर उनके माध्यम से उनके माता-पिता को सौंप दिया गया है।इसके अलावा, वर्ष 2022 में, अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध नालासोपारा सेल के पुलिस अधिकारियों व कर्मचारियों ने अवैध वेश्यावृत्ति के संबंध में अनैतिक व्यापार निवारण अधिनियम, 1956 के तहत कुल 18 कार्रवाई की, तथा 23 अभियुक्तों के विरुद्ध कार्रवाई कर कुल 23 महिलाओं एवं 07 नाबालिग लड़कियों को देह व्यापार से मुक्त कराया गया है, नारकोटिक्स एक्ट के तहत 02 मामले, बाल श्रम अधिनियम के तहत 07 मामले और 11 आरोपियों के खिलाफ कार्रवाई की गई है और कुल 17 बच्चों को रिहा किया गया है। साथ ही कुल 04 फर्जी चिकित्सकों पर कार्यवाही एवं कुल 03 अभियुक्तों के विरूद्ध मुकदमा दर्ज की गयी थी। उक्त सफलता डीसीपी (क्राइम ) अविनाश अंबुरे, ए.सी.पी अमोल मांडवे के मार्गदर्शन में अनैतिक मानवी वाहतुक नालासोपारा सेल के पी.आई संतोष चौधरी व पोउपनिरी प्रकाश निकम की टीम ने पाई है।

दैनिक दबंग दुनिया
मुंबई, गुरुवार, 12 जनवरी 2023
निष्पक्ष नजर, निष्पक्ष खबर
देश का सबसे चर्चित संपूर्ण हिन्दी अखबार

# एस.एस ब्रांच नालासोपारा ने बाल अपहरण के 106 मामलों का पता लगाया

**दबंग रिपोर्टर » वसई**

वर्ष 2022 में मीरा भाईंदर- वसई विरार पुलिस आयुक्तालय अंतर्गत अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध नालासोपारा सेल ने कई घरों के चिराग व परिवार से बिछड़ने से बचाया है। दरअसल सेल ने बाल अपहरण के कुल 106 मामलों का पता लगाने में सफल रही व उनके परिजनों को सही सलामत सौंप दिया गया है,जहां परिवार के चेहरों पर खुशी की रौनक दौड़ पड़ी।

जानकारी के अनुसार,अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध नालासोपारा सेल के माध्यम से अपहृत बच्चों से संबंधित अपराधों की जांच, इस बीच, मीरा-भाईंदर, वसई-विरार पुलिस आयुक्तालय के वसई-विरार सर्किल के पुलिस स्टेशन 2 और 3 में दायर बाल अपहरण के मामलों में वरिष्ठों के मार्गदर्शन में उक्त सेल द्वारा वर्ष 2022 में एक अंतिम जांच की गई, बच्चों के अपहरण के मामले दर्ज होते ही अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध नालासोपारा सेल के पुलिस अधिकारी व कर्मचारियों ने तकनीकी और अन्य जानकारी के आधार पर त्वरित कार्रवाई करते हैं। वर्ष 2022 में कुल 106 अपराध प्रकाश में लाए गए हैं। 38 लड़के और 74 लड़कियों समेत कुल 112 बच्चों को बरामद कर संबंधित जांच अधिकारियों को सौंप कर उनके माध्यम से उनके माता-पिता को सौंप दिया गया है।

इसके अलावा, वर्ष 2022 में, अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध नालासोपारा सेल के पुलिस अधिकारियों व कर्मचारियों ने अवैध वेश्यावृत्ति के संबंध में अनैतिक व्यापार निवारण अधिनियम,1956 के तहत कुल 18 कार्रवाई की,तथा 23 अभियुक्तों के विरुद्ध कार्रवाई कर कुल 23 महिलाओं एवं 07 नाबालिग लड़कियों को देह व्यापार से मुक्त कराया गया है, नारकोटिक्स एक्ट के तहत 02 मामले, बाल श्रम अधिनियम के तहत 07 मामले और 11 आरोपियों के खिलाफ कार्रवाई की गई है और कुल 17 बच्चों को रिहा किया गया है। साथ ही कुल 04 फर्जी चिकित्सकों पर कार्यवाही एवं कुल 03 अभियुक्तों के विरुद्ध मुकदमा दर्ज की गयी थी। उक्त सफलता डीसीपी (क्राइम ) अविनाश अंबुरे, ए.सी.पी अमोल मांडवे के मार्गदर्शन में अनैतिक मानवी वाहतुक नालासोपारा सेल के पी.आई संतोष चौधरी व पोउपनिरी प्रकाश निकम की टीम ने पाई है।

दैनिक
एक साथ प्रकाशित, पालघर, ठाणे, मुंबई,
मुंबई केसरी टाइम्स
www.mumbaikesaritimes.com
वर्ष : १५ अंक : २१६ गुरुवार 12 जनवरी 2023 मूल्य 2 रुपए Post-Reg- No. PLG/95/2020/2022 पृष्ठ : 04

# वर्ष २०२२ में उल्लेखनीय कार्य ; कई घरों के चिराग व परिवार से बिछड़ने से बचाया, मिली सफलता

**वसई** ; वर्ष 2022 में मीरा भाईंदर- वसई विरार पुलिस आयुक्तालय अंतर्गत अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध नालासोपारा सेल ने कई घरों के चिराग व परिवार से बिछड़ने से बचाया है,दरअसल सेल ने बाल अपहरण के कुल 106 मामलों का पता लगाने में सफल रही व उनके परिजनों को सही सलामत सौंप दिया गया है,जहां परिवार के चेहरों पर खुशी की रौनक दौड़ पड़ी।

जानकारी के अनुसार,अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध नालासोपारा सेल के माध्यम से अपहृत बच्चों से संबंधित अपराधों की जांच, इस बीच, मीरा-भाईंदर, वसई-विरार पुलिस आयुक्तालय के वसई-विरार सर्किल के पुलिस स्टेशन 2 और 3 में दायर बाल अपहरण के मामलों में वरिष्ठों के मार्गदर्शन में उक्त सेल द्वारा वर्ष 2022 में एक अंतिम जांच की गई, बच्चों के अपहरण के मामले दर्ज होते ही अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध नालासोपारा सेल के पुलिस अधिकारी व कर्मचारियों ने तकनीकी और अन्य जानकारी के आधार पर त्वरित कार्रवाई करते हैं।

वर्ष 2022 में कुल 106 अपराध प्रकाश में लाए गए हैं। 38 लड़के और 74 लड़कियों समेत कुल 112 बच्चों को बरामद कर संबंधित जांच अधिकारियों को सौंप कर उनके माध्यम से उनके माता-पिता को सौंप दिया गया है।

इसके अलावा, वर्ष 2022 में, अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध नालासोपारा सेल के पुलिस अधिकारियों व कर्मचारियों ने अवैध वेश्यावृत्ति के संबंध में अनैतिक व्यापार निवारण अधिनियम,1956 के तहत कुल 18 कार्रवाई की,तथा 23 अभियुक्तों के विरुद्ध कार्रवाई कर कुल 23 महिलाओं एवं 07 नाबालिग लड़कियों को देह व्यापार से मुक्त कराया गया है, नारकोटिक्स एक्ट के तहत 02 मामले, बाल श्रम अधिनियम के तहत 07 मामले और 11 आरोपियों के खिलाफ कार्रवाई की गई है और कुल 17 बच्चों को रिहा किया गया है।

साथ ही कुल 04 फर्जी चिकित्सकों पर कार्यवाही एवं कुल 03 अभियुक्तों के विरूद्ध मुकदमा दर्ज की गयी थी।

उक्त सफलता डीसीपी (क्राइम ) अविनाश अंबुरे, ए.सी.पी अमोल मांडवे के मार्गदर्शन में अनैतिक मानवी वाहतुक नालासोपारा सेल के पी.आई संतोष चौधरी व पोउपनिरी प्रकाश निकम की टीम ने पाई है।

दैनिक आमची मुंबई
ठाणे/पालघर येथून एकाचवेळी प्रकाशित.
वर्ष : ११ | अंक. २६४ | गुरुवार १२ जानेवारी २०२३ | Post-Reg-No. PLG/158/2022-2024 | रु. २ | पाने: ०८

# २०२२ मध्ये उल्लेखनीय कार्य केले, अनेक घरांचा दिवा आणि संसारापासून विभक्त होण्यापासून वाचवले

**वसई**. २०२२ मध्ये मीरा भाईंदर-वसई विरार पोलीस आयुक्तालय, नालासोपारा सेल अंतर्गत अनैतिक मानवी वाहतूक बंदी मुळे अनेक कुटुंबांना त्यांच्या घरापासून, कुटुंबापासून विभक्त होण्यापासून वाचवले आहे.

कुटुंबाला सुखरूप स्वाधीन करण्यात आल्याने सर्वांच्या चेहऱ्यावर आनंदाचे वातावरण होते. कुटुंब माहितीनुसार, अनैतिक मानवी वाहतूक बंदी नालासोपारा कक्षामार्फत अपहरण झालेल्या मुलांशी संबंधित गुन्ह्यांचा तपास. दरम्यान, मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलिस आयुक्तालय, वसई- येथील पोलिस स्टेशन २ आणि ३ मध्ये बालकांच्या अपहरणाचे गुन्हे दाखल आहेत. के वसई-विरार परिमंडळातील विरार परिमंडळ, सन २०२२ मध्ये सदर सेलकडून अंतिम तपास वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आला. अनैतिक मानवी तस्करी प्रतिबंध




नालासोपारा सेलचे अधिकारी व कर्मचारी तांत्रिक व इतर माहितीच्या आधारे झटपट कारवाई करतात. २०२२ मध्ये एकूण १०६ गुन्हे उघडकीस आले आहेत. ३८ मुले व ७४ मुली अशा एकूण ११२ बालकांना ताब्यात घेऊन संबंधित तपास अधिकाऱ्यांच्या ताब्यात देऊन त्यांच्यामार्फत त्यांच्या पालकांच्या ताब्यात देण्यात आले आहे. याशिवाय सन २०२२ मध्ये पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी अनैतिक मानवी तस्करी बंदी नालासोपारा सेलने अवैध वेश्याव्यवसाय संदर्भात, अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायदा, १९५६ अन्वये एकूण १८ कारवाई केली असून, २३ आरोपींवर कारवाई करून एकूण २३ महिला आणि ०७ अल्पवयीन मुलींची वेश्याव्यवसायातून मुक्तता करण्यात आली आहे. अंमली पदार्थ कायद्यांतर्गत ०२ प्रकरणे, बालकामगारांवर ०७ प्रकरणे व ११ आरोपींवर कारवाई करण्यात आली असून एकूण १७ बालकांची सुटका करण्यात आली आहे. यासह एकूण ०४ बनावट डॉक्टरांवर कारवाई करण्यात आली असून एकूण ०३ आरोपींवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. डीसीपी (गुन्हे) अविनाश अंबुरे, एसीपी अमोल मांडवे यांच्या मार्गदर्शनाखाली नालासोपारा सेलचे पीआय संतोष चौधरी आणि पोपनिरी प्रकाश निकम यांच्या पथकाने हे यश मिळवले आहे.

# वर्षभरात वाहतूक पोलिसांची लाखो वाहनांवर कारवाई

## करोडो रुपयांचा दंड वसूल

◆ **भाईंदर (वार्ताहर) :**

काशिमिरा वाहतूक पोलिसांकडून २०२२ या मागील पूर्ण वर्षभरात मीरा-भाईंदर शहरात वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर कारवाई करण्यात आली आहे. शहरातील वाहनचालकांनी वाहतूक नियमांचे पालन करावे अन्यथा त्यांच्यावर कायदेशीररीत्या कारवाई केली जाणार असे वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रमेश भामे यांनी सांगितले आहे.

काशिमिरा वाहतूक विभागाकडून २०२२ मध्ये १,२४,४७६ कसूरदार वाहन चालकांवर कारवाई करत रुपये ५,०८,९१,०००/- इतका दंड आकारण्यात आलेला आहे. तसेच १,४६१ वाहन चालकाचे अनुज्ञाप्ती (ड्रायव्हिंग लायसन्स) निलंबनाबाबतचा प्रस्ताव देखील आर.टी.ओ.कडे पाठविण्यात आलेला आहे. विना हेल्मेट मोटार सायकल चालविणे कलम १२९/१९४ (डी) प्रमाणे २,३३४ कसुरदार वाहन चालकांवर कारवाई करून रुपये ८,५३,०००/- इतका दंड आकारण्यात आलेला आहे. वर्षभरात मद्यप्राशन करून वाहन चालविणे कलम १८५ प्रमाणे एकूण २४९ कसूरदार वाहनचालकांवर कारवाई करून कोर्टात एकूण ४,९५,३००/- इतका दंड आकारण्यात आलेला आहे. वर्षाच्या शेवटी एक आठवडा विशेष मोहीम राबवून ९९ कसूरदार वाहनचालकांवर कारवाई करत कोर्टात दंड भरण्याकरिता पाठवण्यात आले आहे. मीरा-भाईंदर शहरात सर्वात मोठा चर्चेत असणाऱ्या अवैध प्रवासी वाहतूक परवाना उल्लंघन यांच्यावर एम.एम.व्ही.आर ६६(१)/१९२ (अ) प्रमाणे एकूण ३०२ कसूरदार वाहनचालकांवर कारवाई करत २७,९०,०००/- इतका दंड आकारण्यात आलेला आहे. सिटबेल्ट न लावणाऱ्यावर कलम १९४ (बी) (१) प्रमाणे एकूण २७, ४६५ कसूरदार वाहनचालकांवर कारवाई करत त्यांच्याकडून ५४,९१,२००/- रुपये इतका दंड आकारण्यात आलेला आहे. गेल्या वर्षभरात जवळपास लाखो वाहनचालक यांच्यावर कारवाई करत दंड वसूल करण्यात आला आहे. त्यामुळे शहरातील ८५ टक्के वाहनचालकांनी वाहतूक नियमांचे पालन करण्यास सुरुवात केली असल्याचे निदर्शनास आले आहे. वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांचे समुपदेशन तसेच त्यांच्यामार्फत वाहतूक नियमांचे धडे देण्यात येत असल्याने वाहतूक नियमांची जनजागृती होत आहे.



# पोलिस निरीक्षकांच्या बदल्या

**म. टा. वृत्तसेवा,** मिरा-भाईंदर

मिरा-भाईंदर वसई-विरार पोलिस आयुक्तालयाकडून १३ पोलिस निरीक्षकांच्या अंतर्गत बदल्या करण्यात आल्या आहेत. यासंबंधीचे आदेश मंगळवारी पोलिस उपायुक्त प्रकाश गायकवाड यांनी जारी केले.

मिरा-भाईंदर वसई-विरार पोलिस आयुक्तपदी मधुकर पांडे यांची नियुक्ती झाल्यानंतर, प्रथमच पोलिस निरीक्षकांच्या अंतर्गत बदल्या करण्यात आल्या आहेत. मागच्या अनेक दिवसांपासून अधिकारी बदल्यांच्या प्रतीक्षेत होत्या. अमली पदार्थविरोधी पथकातील देविदास हंडोरे यांची काशिमिरा वाहतूक विभागात, संदीप कदम यांची काशिमिरा पोलिस ठाण्यात, प्रशांत लांगी यांची विरार वाहतूक शाखेत, संजय हजारे यांची परवाना शाखा, परवाना शाखेचे रणजीत आंधळे यांची वसई पोलिस ठाणे, राजेंद्र कांबळे यांची विरार पोलिस ठाण्यात, तर तुळींज पोलिस ठाण्यात नियंत्रण कक्षाचे शैलेंद्र नगरकर यांची बदली करण्यात आली आहे. कल्याणराव कर्पे यांची अर्नाळा पोलिस ठाण्यात, सुरेश वराडे यांची विशेष शाखेत, अमर मराठे यांची अमली पदार्थविरोधी पथकात, वसंत लब्दे यांची पेल्हार पोलिस ठाण्यात व राजू माने यांची नियंत्रण कक्षात बदली करण्यात आली आहे.

# उमेदवारांसाठी सभागृहात सुविधा

**म. टा. वृत्तसेवा,** मिरा-भाईंदर

भाईंदर पश्चिमेच्या नेताजी सुभाषचंद्र बोस मैदानावर पोलिस शिपाई पदाच्या भरतीसाठी मैदानी चाचणी घेतली जात आहे. येथे शहराबाहेरून येणाऱ्या उमेदवारांना राहण्याची सुविधा नसल्याने त्यांना मैदानात झोपावे लागत होते. या पार्श्वभूमीवर पालिकेने या विद्यार्थ्यांना तात्पुरत्या स्वरूपात सभागृहात राहण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. त्यामुळे या विद्यार्थ्यांची गैरसोय टाळणार आहे.

मिरा-भाईंदर वसई-विरार पोलिस आयुक्तालयातील शिपाई व वाहनचालक पदाच्या ९९६ जागांसाठी भरती प्रक्रिया राबवली जात आहे. या जगांसाठी ७४ हजारांहून अधिक उमेदवारांचे अर्ज प्राप्त झाले आहेत. या उमेदवारांची २



जानेवारीपासून नेताजी बोस मैदानावर टप्प्याटप्प्याने मैदानी चाचणी घेण्यात येत आहे. या चाचणीला शहराबाहेरील, म्हणजेच ग्रामीण भागातील बहुतांश उमेदवार येत असून, ते एक दिवस आधी भाईंदरमध्ये पोहोचत आहेत.

या उमेदवारांसाठी शौचालय, पाण्याची व इतर व्यवस्था पोलिस प्रशासनाकडून मैदानाच्या परिसरात उपलब्ध करून देण्यात आली आहे. परंतु, येथे राहण्याची सुविधा नसल्याने शहराबाहेरून येणाऱ्या विद्यार्थ्यांना मैदानातच कडाक्याच्या थंडीत झोपावे लागत होते. परिणामी विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणावर गैरसोयींचा सामना करावा लागत होता. या पार्श्वभूमीवर, मिरा-भाईंदर पालिका आयुक्त दिलीप ढोले यांच्या आदेशानुसार भाईंदर पश्चिमेच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन (नगर भवन) येथील सभागृहात व राई गावातील मैदानातील इमारतीच्या पहिल्या मजल्यावरील सभागृहात अशा दोन ठिकाणी बुधवारपासून राहण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यासंबंधीची माहिती भाईंदर पश्चिम पोलिसांना कळवण्यात आल्याचे पालिकेकडून सांगण्यात आले.

महाराष्ट्र टाइम्स
matagold.in

# नियमभंगात मिरा-भाईंदरकर अव्वल

## गेल्या वर्षभरात एक लाखाहून अधिक वाहनांवर कारवाई; पाच कोटींचा दंड वसूल

**म. टा. वृत्तसेवा,** मिरा-भाईंदर

मिरा-भाईंदरमध्ये २०२२ या वर्षभरात वाहतूक नियम मोडणाऱ्या एक लाखाहून अधिक वाहनचालकांवर काशिमिरा वाहतूक विभागाकडून कारवाई करण्यात आली आहे. या कारवाईतून पाच कोटी रुपयांपेक्षा अधिक दंड वसूल करण्यात आला आहे. आयुक्तालयाच्या अखत्यारीत येणाऱ्या इतर वाहतूक विभागांकडून करण्यात आलेल्या कारवाईच्या तुलनेत ही आकडेवारी मोठी आहे. त्यामुळे वाहतूक नियमभंग करणाऱ्यांमध्ये मिरा-भाईंदरकर अव्वल असल्याचे दिसून येत आहे.

मिरा-भाईंदर महापालिका हद्दीत वाहतुकीच्या नियमांचे काटेकोर पालन केले जावे, या दृष्टीने कारवाईची जबाबदारी काशिमिरा वाहतूक पोलिसांकडे आहे. त्यांच्याकडून वाहतूक नियमांचे महत्त्व वाहनचालकांना पटवून देण्यासाठी जनजागृतीपर कार्यक्रम व इतर विविध उपक्रम राबवले जात आहेत. मात्र त्यानंतरही विना-सीटबेल्ट, विना-हेल्मेट प्रवास करणे, दारू पिऊन वाहन चालवणे व अवैध प्रवासी वाहतूक यांसारखे प्रकार सुरूच आहेत. त्यामुळे शहराच्या मुख्य चौकांमध्ये नियमित नाकाबंदी व टोईंग वाहनांद्वारे फिरती कारवाई केली जात आहे. वाहतूक शाखेमार्फत विशेष मोहिमा राबवून बेजबाबदार वाहनचालकांवर कारवाई केली जात आहे.

मिरा-भाईंदरमध्ये मागच्या वर्षभरात तब्बल एक लाख २६ हजार ४७६ वाहनांवर वाहतूक नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी काशिमिरा वाहतूक विभागाने कारवाई केली आहे. या वाहनचालकांकडून दंड स्वरूपात तब्बल पाच कोटी आठ लाख ९१ हजार



रुपये वसूल करण्यात आले आहेत. याव्यतिरिक्त दंडवसुली न झालेल्या सुमारे १९ हजार प्रकरणांतून एक कोटी रुपयांची वसुली प्रलंबित आहे.

या व्यतिरिक्त आयुक्तालयाच्या अंतर्गत येणाऱ्या वसई वाहतूक शाखेने ६२ हजार वाहनचालकांवर कारवाई करत, सुमारे अडीच कोटींचा दंड वसूल केला आहे, तर एक कोटीचा दंड वसूल करणे अद्याप बाकी आहे. विरार शाखेने ८३ हजारांहून अधिक वाहनचालकांवर कारवाई करून दीड कोटी रुपयांचा दंड वसूल केला आहे, यासह दीड कोटींहून अधिक दंड वसूल करणे अद्याप बाकी आहे. काशिमिरा वाहतूक पोलिसांनी केलेली कारवाई व दंडवसुली ही वसई व विरार शाखेच्या तुलनेत अधिक असल्याचे या आकडेवारीवरून दिसत आहे.

**उल्लंघनाची प्रकरणे**

| विभाग | वाहनांवर कारवाई | दंडवसुली | वसुली बाकी |
|---|---|---|---|
| मिरा-भाईंदर | १,२६,४७६ | ५.०८ कोटी | १ कोटी |
| वसई | ६२,००० | २.५५ कोटी | १ कोटी |
| विरार | ८३,००० | १.५ कोटी | १.५ कोटी |

**काशिमिरा वाहतूक शाखेची कारवाई**

| | चालकांवर कारवाई | दंड वसूल (रु.) |
|---|---|---|
| विना हेल्मेट | २,३३४ | ८ ,५३,००० |
| मद्यपान | २४९ | ४,९५,३०० |
| अवैध वाहतूक | ३०२ | २७,९०,००० |
| सीटबेल्ट न लावणे | २७,४६५ | ५४,९१,२०० |

### मृत्यू घटले

काशिमिरा वाहतूक विभागाच्या हद्दीत २०१५ साली रस्ते अपघातात ८१ मृत्यू झाले होते. त्यानंतर वाहतूक नियमांचे पालन करण्यासाठी नियमितपणे कडक कारवाई केली जात आहे. त्यामुळे अपघाती मृत्यूंचे प्रमाण घटून गेल्या वर्षी २६ वर आले आहे. हे प्रमाण आणखी कमी करण्याच्या दृष्टीने, कारवाईसह जनजागृतीसाठी प्रयत्न करणार असल्याची माहिती काशिमिरा वाहतूक विभागाचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक रमेश भामे यांनी दिली.

